| संक्षीप्त फौजदारी खटला क्रं.८१०/२०२२ | MHAH150018382022 |
|---|---|

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७४ चा अधिनियम दोन प्रकरण एकविस अन्वये संक्षीप्त संपरिक्षा केलेली ए.ए. पाचरणे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३ नेवासा, यांचे न्यायालयात**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | – | ३०.०७.२०२२ |
| २. | अहवालाचा दिनांक | – | ३०.०७.२०२२ |
| ३. | फिर्यादीचे नांव वय व पत्ता | – | **महाराष्ट्र सरकारतर्फे,**<br>**संतोष हरिभाऊ वाघ,**<br>पो.कॉ. ब.नं.९२६<br>शनिशिंगणापूर पोलीस ठाणे,<br>ता. नेवासा, जि.अहमदनगर, |
| ४. | आरोपीचे नांव वय व पत्ता | – **१.** | **गणेश रावसाहेब ब्राम्हणे,**<br>वय २३ वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>रा. घोडेगाव, ता.नेवासा, जि.अहमदनगर. |
| | | **२.** | **रोहित रमेश फुलारी,**<br>वय १९ वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>रा. सोनई,<br>ता. नेवासा, जि. अहमदनगर. |
| ५. | आरोपीला समजावून सांगणेचा | – | भारतीय दंड संहिता कलम ३४१, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे. |

६. **तपशिल :–**

तुम्ही दिनांक ३०.०७.२०२२ रोजी १३.०० वाजणेचे सुमारास मौजे शनिशिंगणापुर गावात अहमदनगर ते औरंगाबाद हायवे रोडवर शनिशिंगणापुर फाटा, ता. नेवासा, जि. अहमदनगर येथे दर्शनाकरिता येणारे भाविकांना आडवून त्यांना पुढे जाण्यास प्रतिबंध करुन व भाविकांना ठराविक दुकानातून दर्शनाकरिता लागणारे पुजेचे साहित्य घेणेकरिता दमदाटी करुन प्रवृत्त करताना मिळुन आला. त्यायोगे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ३४१, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे अपराध केलेला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या दखलगिरीत घडला आहे. आरोपीला आरोप वाचून दाखविणेत आला व समजाविणेत आला.

७. **आरोपीचे प्रतिकथन**

प्र. १ तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर होय.

प्र. २ दोषारोपातील आरोप तुम्हाला वाचून व समजावून सांगितले ते तुम्हाला समजले काय ?

उत्तर होय.

प्र. ३ तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर होय, मला गुन्हा कबूल आहे.

दिनांक १२.११.२०२२.

..................... .....................

**१. गणेश रावसाहेब ब्राम्हणे,** **२. रोहित रमेश फुलारी,**

आरोपीची सही आरोपीची सही

समोर,

सही/-

(**ए.ए.पाचरणे**)

पॅनल प्रमुख, राष्ट्रीय लोकअदालत तथा

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,(क.स्तर) नेवासा,

पॅनल क्र.७

आरोपींनी सदरचा गुन्हा कबूल केलेला आहे. आरोपींचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. आरोपींनी हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. तरी कमीत कमी शिक्षा व्हावी अशी विनंती केली. गुन्हयाचे स्वरुप पाहता खालील प्रमाणे आदेशित केलेली शिक्षा न्यायसंगत दिसून येते.

**आदेश**

आरोपी **१. गणेश रावसाहेब ब्राम्हणे व २. रोहित रमेश फुलारी,**याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३४१ व ५०६ प्रमाणे केलेल्या अपराधामध्ये दोषी धरणेत येते असून आरोपी क्र.१ व २ यांना भारतीय दंड संहिता कलम ३४१ या गुन्हयाकरीता प्रत्येकी **रक्कम रुपये १००/-(रुपये शंभर फक्त) दंडाची** शिक्षा व आरोपी क्र.१ व २ यांना भारतीय दंड संहिता कलम ५०६ या गुन्हयाकरीता प्रत्येकी **रक्कम रुपये १००/-(रुपये शंभर फक्त) दंडाची** सुनावणेत येत आहे. वरील एकूण **दंडाची रक्कम न भरल्यास ४ दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा** सुनावणेत येत आहे**.** सही/-

दि.१२.११.२०२२. (**ए.ए.पाचरणे**)

पॅनल प्रमुख, राष्ट्रीय लोकअदालत तथा

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,(क.स्तर) नेवासा,

पॅनल क्र.७